PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Paulwaat
Year: 2011

Song: Dukhhe Jhali Udan Chhu
Lyricist:

आल्ला मंतर कोल्ला मंतर
चल मारू प्रेमाने फुंकर
आल्ला मंतर कोल्ला मंतर
चल मारू प्रेमाने फुंकर
ओठावरती आले हासू
ओठावरती आले हासू
ओठावरती आले हासू
दु:खे झाली उडन छू

उडन छू उडन छू उडन छू
दु:खे झाली उडन छू
चिंता झाल्या उडन छू
काळजी झाली उडन छू
उडन छू

दु:खे झाली उडन छू
चिंता झाल्या उडन छू
काळजी झाली उडन छू

हिरमुसलेल्या
हो हिरमुसलेल्या दारावरती
संधीची टकटक झाली
हात पुढे कर दोस्तीचा
अन् जगण्याला दे टाळी
हिरमुसलेल्या दारावर
संधीची टकटक झाली
हात पुढे कर दोस्तीचा
अन् जगण्याला दे टाळी
टुकटुक कर या अंधाराला

आभाळ बाबा उदार झाला
टुकटुक कर या अंधाराला
आभाळ बाबा उदार झाला
घेऊन आला खिसेभरून
चमचमते हिरे पाचू

उडन छू
दु:खे झाली उडन छू
चिंता झाल्या उडन छू
काळजी झाली उडन छू
उडन छू

दु:खे झाली उडन छू
चिंता झाल्या उडन छू
काळजी झाली उडन छू
छू छू छू आ...

चहू दिशांनी सोनेरी
किरणांची चाहूल आली
तिमिरावरती आशेची
कुणी काढली रांगोळी
चहू दिशांनी सोनेरी
किरणांची चाहूल आली
तिमिरावरती आशेची
कुणी काढली रांगोळी
रंग मिळाले चराचराला चराचराला
पंख लाभले विश्वासाला
विश्वासाला
रंग मिळाले चराचराला

Literacy for a Billion

पंख लाभले विश्वासाला
हसू लागले डोळ्यांमधूनी
ओघळणारे हे दवबिंदू
उडन छू उडन छू
उडन छू उडन छू

उडन छू उडन छू
दुःखे झाली उडन छू
चिंता झाल्या उडन छू
काळजी झाली उडन छू
उडन छू

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*